शुक्रवार, दि. १७ एप्रिल २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक २२७ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

[illegible] हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# जालना शहरात नारी शक्ती वंदन या कायद्यास भव्य रॅली काढून समर्थन




**जालना । प्रतिनिधी -** नरेंद्र मोदी सरकारने केलेल्या नारी शक्ती वंदन अधिनियमाच्या समर्थनार्थ आज दि. १६ रोजी गुरुवारी सकाळी ९.०० वा जालना मामाचौका मध्ये एकत्रित होऊन नरेंद्र मोदी सरकारने ने घेतलेल्या निर्णयाचे स्वागत करण्यासाठी सर्व महिला एका ठिकाणी येऊन केंद्र सरकारच्या समर्थनार्थ घोषणाबाजी व नारेबाजी करून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नावाचा जयघोष केला. त्या नंतर महिला मोर्चा जिल्हाध्यक्षा शुभांगीताई देशपांडे, महापौर वंदना मगरे, माजी नगराध्यक्षा संगीताताई गोरंटया, नगरसेविका सुशीला दानवे, पूनम स्वामी या प्रमुख महिला पदाधिकाऱ्यांच्या नेतृत्वात भव्य रैलीचे आयोजन करून रैली मामाचौक-सावरकर चौक-अलंकार चौक-महावीर चौक ते परत मामा चौक या ठिकाणी येऊन रैली चा समारोप करण्यात आला. या रैली मध्ये जालना शहरातील महिलांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवून महिलांनी हातात विधेयकाच्या समर्थनाचे फलक घेऊन केंद्र सरकारचे आभार व्यक्त केले. यावेळी फुगड्या खेळून नारी शक्ती वंदन विधेयकाचा विजय असो'' पंतप्रधान नरेंद्र मोदींचे आभार''''महिला सक्षमीकरण - देशाची प्रगती'' नारी शक्ती वंदन चा विजय असो, नारी शक्ती की पुकार सिर्फ मोदी सरकार, दिला नारी शक्तीला सन्मान मोदीजींचा आम्हाला अभिमान अशा घोषणा देण्यात आल्या. रॅलीत केवळ राजकीय कार्यकर्त्याच नव्हे, तर बचत गटातील महिला, महाविद्यालयातील विद्यार्थिनी, विविध स्वयंसेवी संस्थांच्या प्रतिनिधी आणि गृहिणी मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या.

यावेळी मार्गदर्शन करताना भास्कर आबा दानवे म्हणाले की, नरेंद्र मोदी सरकारने घेतलेला ३३% आरक्षणाचा निर्णय हा महिलांच्या सन्मानाचा आणि त्यांच्या अधिकारांचा विजय आहे. या निर्णयामुळे महिलांना राजकारणात नेतृत्व करण्याची मोठी संधी मिळणार असून, देशाच्या विकास प्रक्रियेत त्यांचा सहभाग अधिक बळकट होईल.

महिलांचे विचार, अनुभव आणि दृष्टिकोन शासन व्यवस्थेत समाविष्ट झाल्यास अधिक समतोल आणि सर्वसमावेशक निर्णय घेता येतील. हा निर्णय भारताला अधिक प्रगत आणि सक्षम राष्ट्र बनविण्यासाठी महत्त्वाचा ठरणार आहे.

यावेळी संगीताताई गोरंटयाल म्हणाल्या की, महिलांना ३३% आरक्षण मिळाल्यामुळे त्यांना राजकारणात पुढे येण्याची मोठी संधी उपलब्ध झाली आहे. या निर्णयामुळे महिलांचे सक्षमीकरण अधिक वेगाने होईल आणि समाजात त्यांचा सन्मान वाढेल. महिलांनी आता पुढे येऊन नेतृत्व स्वीकारणे गरजेचे असून, देशाच्या विकासात सक्रिय सहभाग नोंदवावा, असे त्यांनी आवाहन केले.

या रॅलीचे आयोजन शुभांगी देशपांडे यांनी केले. यावेळी त्या म्हणाल्या की, मोदी सरकारने महिलांना राजकारणात समान हक्क व संधी मिळवून देण्यासाठी ३३% आरक्षणाचा निर्णय अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. या निर्णयामुळे महिलांचा आत्मविश्वास वाढून त्या अधिक सक्षमपणे समाज व देशाच्या विकासात योगदान देतील. भविष्यात निर्णय प्रक्रियेत महिलांची भूमिका अधिक प्रभावी होणार आहे. तसेच, या रॅलीत उत्स्फूर्त सहभाग नोंदविणाऱ्या सर्व माता-भगिनींचे त्यांनी मनः पूर्वक आभार.

यावेळी उपमहापौर राजेश राऊत, अशोक पांगारकर, विजय कामड, धनराज काबलिये, महेश निकम, अमोल धानुरे, वसंत शिंदे, शिवप्रकाश चितळकर, अरुणा जाधव, शशिकांत घुगे, सखुबाई पणबिसरे, सुषमा खरात, वर्षा राऊत, ज्योती सले, कल्याण भदनेकर, श्रद्धा साळवे, अनिता खोडवे, कार्तिका इंगळे, वीरेंद्र धोका, आनंद झारकंडे, ऐश्वर्या आडेकर, मंगल गरदास, स्नेहलता कामड, यास्मिन शेख, संजय पाखरे, रोहित भूरेवाल, पार्वताबाई देशमाने, सुलोचना गोर्डे, संजय भगत, रेखा भवर, गणेश जल्लेवार, नंदकिशोर गरदास, मनोज इंगळे, राधाबाई जाधव, कविता कनिसे, लक्ष्मी भवरे, गुन्नाबाई सूर्यवंशी, शकुंतला वाघ, मंदाबाई मुंगसे, राधाबाई सासणे, आकाश देशमाने, आदित्य बोराडे, पुष्पा मेहेत्रे, वैशाली बनसोडे, सिद्धिविनायक मुळे, अर्जुन गेही, सुहास वावरे, अमित मानधने, रवी सले, संदीप नाईकवाडे, बापू साळवे, ज्ञानेश्वर ढोबळे, अमोल भवर, इत्यादी प्रमुख मान्यवर नगरसेवकांसह जालना शहरातील महिला भगिनी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जालना मर्चंट बँकेची २३ कोटींची फसवणूक

### मुख्य सूत्रधार रायचंद कुरंगळला अहिल्यानगरमधून अटक

**जालना । प्रतिनिधी -** बोगस पावती पुस्तकांच्या आधारे कर्ज उचलून जालना मर्चंट को-ऑपरेटिव्ह बँकेची सुमारे २३ कोटी ३३ लाख रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी, मुख्य आरोपी रायचंद सखाराम कुरंगळ याला जालना आर्थिक गुन्हे शाखेने () अहिल्यानगर (अहमदनगर) जिल्ह्यातील श्रीगोंदा येथून अटक केली आहे. न्यायालयाने आरोपीला ८ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, रायचंद कुरंगळ हा पंचमुखी वेअर हाऊस या फर्मचा मालक आहे. त्याने जालना मर्चंट बँकेसोबत एक व्यावसायिक करार केला होता. या करारानुसारः वेअर हाऊसमध्ये शेतकऱ्यांचा किंवा मालधारकांचा माल साठवल्यानंतर त्यांना अधिकृत पावती देणे बंधनकारक होते.

या पावतीवर मालाचा टॅग क्रमांक, मालधारकाचे नाव आणि मालाचा तपशील असणे आवश्यक होते.

या पावत्यांच्या आधारे बँक संबंधित मालधारकांना कर्ज वितरित करत असे.

आरोपीने बँकेच्या जालना (न्यू मार्केट यार्ड), भोकरदन, अंबड, देऊळगाव राजा, गेवराई आणि मंठा अशा विविध शाखांमधील १७७ मालधारकांना आपल्या वेअर हाऊसमध्ये माल जमा केल्याच्या पावत्या दिल्या.

या पावत्यांच्या आधारे बँकेने कोट्यवधींचे कर्ज वाटप केले. परंतु, जेव्हा यापैकी १३३ खातेदारांनी कर्जाची परतफेड केली नाही, तेव्हा बँकेने थकीत कर्जासाठी तारण असलेल्या मालाचा लिलाव करण्याची प्रक्रिया सुरू केली.

बँकांचे अधिकारी जेव्हा मालाची पाहणी करण्यासाठी वेअर हाऊसवर गेले, तेव्हा कुरंगळ याने विविध कारणे सांगून दोन महिने टाळाटाळ केली. अखेर, गोदामात कोणताही माल नसल्याचे उघड झाले आणि बँकेची मोठी फसवणूक झाल्याचे समोर आले.

बँकेच्या महाव्यवस्थापकांनी दिलेल्या तक्रारीवरून जालना येथील चंदनझीरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचे गांभीर्य ओळखून पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल यांनी तपास आर्थिक गुन्हे शाखेकडे सोपवला.

फरार होण्याचा प्रयत्नः गुन्हा दाखल होताच आरोपी कुरंगळ जालना सोडून फरार झाला होता.

तांत्रिक तपासः पोलिसांनी तांत्रिक विश्लेषणाद्वारे आरोपीचा माग काढला. तो अहिल्यानगर जिल्ह्यातील श्रीगोंदा परिसरात असल्याचे निष्पन्न झाले.

सापळाः आर्थिक गुन्हे शाखेच्या पथकाने रात्री उशिरा श्रीगोंदा येथे धाड टाकून त्याला ताब्यात घेतले. आरोपीला न्यायालयात हजर केले असता, सरकारी पक्षाचा युक्तिवाद ग्राह्य धरून न्यायालयाने त्याला ८ दिवसांची पोलीस कोठडी () मंजूर केली आहे.

या तपासात आता खालील बाबींवर लक्ष केंद्रित केले जाणार आहेः

**२३ कोटींची रक्कम नेमकी कुठे वळवण्यात आली?**

या फसवणुकीत बँकेचे काही अधिकारी किंवा कर्मचारी सामील होते का?

बोगस कर्जदार दाखवून हा पैसा हडपण्यात आला आहे का?

ही यशस्वी कामगिरी पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल, अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी आणि आर्थिक गुन्हे शाखेचे प्रभारी सुरेश उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक मिथुन घुगे, पीएसआय शैलेश म्हस्के आणि त्यांच्या पथकाने केली आहे.

## डॉ. संजय लाखे पाटील यांची महाराष्ट्र राज्य बालहक्क संरक्षण आयोगाच्या सदस्यपदी नियुक्ती



**जालना । प्रतिनिधी -** महाराष्ट्र राज्य बालहक्क संरक्षण आयोगाच्या सदस्यपदी डॉ. संजय निळकंठराव लाखे पाटील यांची नियुक्ती करण्यात आली आहे. महाराष्ट्र शासनाने यासंदर्भातील अधिकृत शासन आदेश आणि नियुक्ती पत्र जारी केले असून, ही नियुक्ती राज्याचे मुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्य नेते ना. एकनाथराव शिंदे यांच्या शिफारशीनुसार करण्यात आली आहे.

बालहक्क आयोगाचे सचिव पंकज देवरे यांनी डॉ. लाखे पाटील यांना नियुक्तीचे पत्र नुकतेच प्रदान केले आहे. महाराष्ट्र राज्य बालहक्क संरक्षण आयोग ही ० ते १८ वर्षे वयोगटातील बालकांच्या (मुले व मुली) वैधानिक आणि कायदेशीर हक्कांचे संरक्षण करणारी महत्त्वाची संस्था आहे. या आयोगाला अर्धन्यायालयीन अधिकार असून बालकांचे अधिकार, त्यांचे संरक्षण आणि नियमन करण्याची मुख्य जबाबदारी या आयोगावर असते. डॉ. लाखेपाटील यांच्या नियुक्तीमुळे राज्यातील बालहक्क अंमलबजावणीला मोठी गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

डॉ. संजय लाखेपाटील यांच्या मार्गदर्शनाखाली बालन्याय (मुलांची काळजी व संरक्षण) कायदा २०१५, लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षण कायदा २०१२ (पोक्सो), बाल शिक्षण हक्क कायदा २००९ (आरटीई) आदी कायद्यांची राज्यभर प्रभावी अंमलबजावणी आणि नियमन केले जाणार आहे

. या नियुक्तीबद्दल डॉ. संजय लाखे पाटील यांनी उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांचे विशेष आभार मानले आहेत. बालकांच्या कायदेशीर हक्कांसाठी काम करण्याची मोठी संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल ऋणी असल्याचे सांगून त्यांनी राज्याच्या महिला व बालविकास मंत्री अदितीताई तटकरे, खा. श्रीकांत शिंदे, खा. नरेश म्हस्के यांच्यासह मंत्रिमंडळातील उदय सामंत, शंभुराजे देसाई, संजय शिरसाट, दादाजी भुसे, संजय राठोड, गुलाबराव पाटील, प्रताप सरनाईक, योगेश कदम आणि ना. जैस्वाल या मंत्र्यांचे आभार व्यक्त केले आहेत.

डॉ. संजय लाखेपाटील यांना कायदेशीर क्षेत्रातील सखोल ज्ञान, विविध न्यायालयांमधील खटल्यांचे निकाल आणि प्रशासकीय कामकाजाचा प्रदीर्घ अनुभव आहे. त्यांच्या या अभ्यासपूर्ण अनुभवाचा फायदा महाराष्ट्र राज्य बालहक्क संरक्षण आयोगाच्या कामकाजात होईल आणि राज्यातील पीडित बालकांना न्याय मिळेल, असा विश्वास सामाजिक स्तरातून व्यक्त होत आहे. त्यांच्या या नियुक्तीचे सर्व स्तरातून स्वागत होत असून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

> महाराष्ट्र शासनाने माझ्यावर सोपवलेली ही जबाबदारी मी अत्यंत विनम्रतेने स्वीकारतो. बालके हा देशाचा आणि राज्याचा आधारस्तंभ आहेत. त्यांच्या वैधानिक आणि कायदेशीर हक्कांचे संरक्षण करणे ही केवळ कायदेशीर प्रक्रिया नसून ती एक सामाजिक बांधिलकी आहे. राज्यातील प्रत्येक बालकाला सुरक्षित वातावरण, दर्जेदार शिक्षण आणि शोषणापासून मुक्ती मिळावी, यासाठी मी कटिबद्ध राहीन. माझ्यावर विश्वास दाखवून ही मोठी जबाबदारी सोपवल्याबद्दल मी उपमुख्यमंत्री ना. एकनाथराव शिंदे यांचा मनापासून आभारी आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली बालकांच्या कल्याणासाठी धोरणात्मक निर्णय घेण्यावर माझा भर असेल.
> **- डॉ. संजय लाखे पाटील**




**जालना महानगरपालिकेच्या नवनियुक्त आयुक्त श्रीमती अंजली शर्मा यांची भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष श्री. भास्कर आबा दानवे यांनी भेट घेऊन पुष्पगुच्छ देत स्वागत केले व त्यांच्या पुढील कार्यकाळासाठी मनःपूर्वक शुभेच्छा देण्यात आल्या**

### भटक्या कुत्र्यांचा हैदोस

## शिवसेना नगरसेवक दुर्गेश काठोटीवाले आक्रमक; मनपा कार्यालयात कुत्री सोडण्याचा दिला इशारा!

**जालना । प्रतिनिधी -** शहरात वाढलेला भटक्या कुत्र्यांचा सुळसुळाट आणि महानगरपालिका प्रशासनाचे याकडे होणारे दुर्लक्ष यावरून शिवसेना नगरसेवक दुर्गेश काठोटीवाले यांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे. ''महानगरपालिकेवर सत्ताधाऱ्यांचा कोणताही वचक राहिला नसून, प्रशासनाचा कारभार रामभरोसे चालला आहे,'' अशा शब्दांत त्यांनी आपला संताप व्यक्त केला.

**''निवेदन कसले देता? कारवाई करा!''**

सत्ताधाऱ्यांच्या कार्यपद्धतीवर ताशेरे ओढताना काठोटीवाले म्हणाले की, खुद्द सत्ताधारीच प्रशासनाला निवेदने देत आहेत. ''सत्ताधारी निवेदने का देतात? त्यांनी थेट कारवाई करायला हवी. निव्वळ कागदी घोडे नाचवून जनतेची दिशाभूल करणे थांबवावे. या सर्व गोंधळाला प्रशासन आणि सत्ताधारी पूर्णपणे जबाबदार आहेत,'' असा थेट आरोप त्यांनी केला.

**निर्बीजीकरणाचा आकडा सतराशे साठ; जमिनीवर मात्र शून्य काम**

महानगरपालिकेकडून भटक्या कुत्र्यांच्या निर्बीजीकरणाचे जे आकडे सादर केले जात आहेत, त्यावर काठोटीवाले यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

खोटा दावाः प्रशासनाकडून १७६० कुत्र्यांचे निर्बीजीकरण झाल्याचे सांगितले जाते, मात्र प्रत्यक्षात शहरात कुत्र्यांची संख्या कमी झालेली नाही.

दिरंगाईः प्रत्यक्षात केवळ ८-१० कुत्री उचलली जातात आणि कागदावर मात्र मोठे आकडे दाखवले जातात.

अकार्यक्षम एजन्सीः ज्या एजन्सीला निर्बीजीकरणाचे काम दिले आहे, ती पूर्णपणे अपयशी ठरली आहे.

नगरसेवकांच्या प्रमुख मागण्याः

एजन्सीवर कारवाईः सध्या काम करत असलेल्या एजन्सीकडून काम काढून घेऊन त्यांच्यावर कठोर कारवाई करावी.

नवीन नियुक्तीः तत्काळ नवीन आणि कार्यक्षम एजन्सीची नेमणूक करण्यात यावी.

तातडीने बंदोबस्तः वाढत्या हल्ल्यांच्या पार्श्वभूमीवर भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त युद्धपातळीवर करावा.

''प्रशासनाने जर लवकरात लवकर या समस्येवर तोडगा पान २ वर

## विनोदाचा बादशहा चार्ली चॅप्लिन

जगातला सर्वात लोकप्रिय अभिनेता, विनोदाचा बादशहा चार्ली चॅप्लिन याची जयंती आहे. पहिल्या महायुद्धाच्या अगोदाच्या काळात मुकपटात अभिनय करून आपल्या आगळ्या वेगळ्या शैलीने प्रेक्षकांना मनमुराद हसावणाऱ्या चार्ली चॅप्लिन यांचा जन्म १६ एप्रिल १८८९ रोजी लंडन येथे झाला. चार्ली चॅप्लिन यांनी आपल्या अभिनयाची सुरवात शालेय जीवनापासूनच केली. वयाच्या नवव्या वर्षी शाळेतल्या नृत्यपथकात त्यांची निवड झाली. या नृत्यपथकाद्वारे सादर होणाऱ्या कार्यक्रमात ते अभिनय आणि नृत्य करत. त्यांची आई मानसिक आजाराने त्रस्त असल्याने वयाच्या तेराव्या वर्षीच त्यांना शाळा सोडावी लागली. अर्थाजनासाठी ते लहान मोठे कामे करू लागले. घरची परिस्थिती हलाखीची असूनही त्यांनी आत्मविश्वास कमी होऊ दिला नाही. परिस्थितीने उलट त्यांना खंबीर बनवले. त्यावेळेच्या परिस्थितीबद्दल चार्ली चॅप्लिन आपल्या आत्मचरित्रात म्हणतात ''मला त्या परिस्थितीचे चटके फार काळ सहन करावे लागले नाही कारण आम्ही त्या परिस्थितीतून सतत वाटचाल करत होतो आणि लहान असल्यामुळे हा त्रास मी सहज विसरून जायचो.'' त्यांचा आत्मविश्वास कणखर होता छोटीमोठी कामे करूनही ते कधीही आपल्या ध्येयापासून ढळले नाहीत. मोठा अभिनेता होण्याचे ध्येय पूर्ण करण्यासाठी ते नाटक कंपन्यांना नित्यनियमाने संपर्क साधत. त्यांच्या मेहनतीला फळ मिळाले त्यांना अनेक नाटकात भूमिका मिळू लागल्या. पुढे मोठया पडद्यावर देखील त्यांना संधी मिळत गेली. पडद्यावरील त्यांचे मस्तमौला आगळेवेगळे रूप प्रेक्षकांना खूप भावले. पडद्यावर त्यांची इन्ट्री झाली की प्रेक्षक खळखळून हसत. एक टाईट कोट, छोटी हॅट, मोठे शूज आणि चेहऱ्यावरील छोटीशी मिशी असं त्यांचं पडद्यावरील वेडगळ रूप प्रेक्षकांना खूप भावले. हे वेडगळ रूप प्रेक्षकांना इतकं आवडलं की पुढं हेच त्यांचं वेडगळ रूप त्यांची ओळख बनली. या व्यक्तरिखेबद्दल ते आपल्या आत्मचरित्रात म्हणतात '' ज्या क्षणी मी तो पोशाख केला, मेकअप केला, त्याच क्षणी मी ती व्यक्तिरेखा अनुभवू लागलो. मी त्याला ओळखयचो आणि रंगमंचावर असेपर्यंत तो माझ्यात भिनलेला असायचा.'' चार्ली चॅप्लिन यांनी आयुष्याचं सार पडद्यावर अनेक तऱ्हेने जगपुढे मांडले. खिल्ली उडवण्यासाठी दुःख हे कारण असतं. खिल्ली उडवणे म्हणजे प्रतिकार करणे निसर्गाच्या शक्तीपूढे स्वतःच्या हतबलतेतही आपण हसत राहिले पाहिजे. प्रतिकुलतेचा हसत हसत सामना केला पाहिजे, नाहीतर मानसिकरीत्या खचून जाल असे ते म्हणत म्हणूनच त्यांच्या आयुष्याच्या जवळचा चित्रपट द कीड याचं ओपनिंग टायटल होतं'' अ पिक्चर विथ अ स्माईल अँड परहॅप्स अ टयिर.'' स्वतःच दुःख विसरून आईचे स्वप्न साकार करण्यासाठी त्यांनी पडद्यावर वेडगळ भूमिका करुन जगभरातील प्रेक्षकांच्या मनावर राज्य केले. भाषेच्या बंधनाविना पडद्यावरून तो कुठल्याही प्रेक्षकांशी संवाद साधू शकला त्यासाठी त्यांनी वापरलेले साधन म्हणजे भरपूर हासू आणि थोडेसे आसू. चार्ली चॅप्लिन यांच्या अभिनयाचे वैशिष्ट्य म्हणजे ते प्रेक्षकांना गडबडा लोळायला लावून हसवत आणि दुसऱ्याच क्षणी डोळ्यात पाणी आणून रडवत. आत्मवश्विासाच्या जोरावर त्यांनी अनेक युक्त्या करून त्या पडद्यावर साकारल्या आणि गाजवल्या. जागतिक पटलावर महानायक म्हणून ते आयुष्यभर वावरले. पहिल्या महायुद्धाच्या काळातही त्यांनी लोकांना हसवण्याचे कार्य केले. २५ वर्षानंतर जागतिक मंदी आणि हिटलरच्या काळातही त्यांनी प्रेक्षकांना हसवण्याचे कार्य थांबवले नाही. लोकांना ज्याकाळात मनोरंजनाची आणि हास्याची अधिक गरज होती त्याकाळात चार्ली चॅप्लिन यांनी लोकांसाठी उत्तम भूमिका बजावल्या. २५ डिसेंबर १९७७ रोजी प्रेक्षकांना खळखळून हसवणारा हा महान अभिनेता पप्रेक्षकांना दुःख सागरात लोटून काळाच्या पडद्याआड गेला. चार्ली चॅप्लिन यांना जयंतीदिनी भावपूर्ण आदरांजली.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५.**

### पान १ वरुन

## शिवसेना नगरसेवक...

काढला नाही, तर आम्ही महानगरपालिका कार्यालयात भटकी कुत्री सोडू!'' असा ईशारा नगरसेवक दुर्गेश काठोटीवाले यांनी दिला आहे

**नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण**

शहरातील विविध वसाहतींमध्ये भटक्या कुत्र्यांनी उच्छाद मांडला असून लहान मुले आणि वृद्धांना घराबाहेर पडणे कठीण झाले आहे. या पार्श्वभूमीवर काठोटीवाले यांनी घेतलेल्या आक्रमक भूमिकेला आता जनसामान्यांतूनही पाठिंबा मिळत आहे. आता महानगरपालिका प्रशासन या इशाऱ्याची दखल घेते की पुन्हा आश्वासनांची गाजरे दाखवते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# आमदार-खासदार,मंत्री यांना सरकार पगार, पेन्शन,भत्ते देऊ शकते; तर ईपीएस-९५ पेंशन धारकांना किमान ७५०० रुपये पेंशन का देऊ शकत नाही?

१७ मार्च २०२६ ला एका संसदीय समितीने ईपीएस-९५ पेंशनधारकांना निवृत्तीवेतन किमान ७५०० रूपये करावे याकरिता सरकारकडुन समिति स्थापन करण्यात आली याचे काय झाले ते सरकार सांगायला तयार नाही.परंतु महिला आरक्षणाच्या नावाखाली लोकसभेतील ५४३ वरून ८५० खासदार करण्याची घाई सरकारला जास्तच पडली असल्याचे दिसून येते.परंतु ईपीएस-९५ पेंशनच्या महत्त्वपूर्ण शिफारशीचे काय झाले हे सांगायला सरकार तयार नाही. गेल्या १२ वर्षांपासून ईपीएस-९५ पेंशन धारक किमान पेन्शन ७५०० रूपये मिळावे यासाठी सतत आंदोलन करून ही बाब सरकारच्या व लोकप्रतिनिधींच्या निदर्शनास आणून देत आहे तरीही सरकार ईपीएस-९५ पेंशनधारकांकडे दुर्लक्ष करीत आहे.या गंभीर आणि जटील समस्येकडे सरकारने दुर्लक्ष केल्यामुळे गेल्या १२ वर्षांपासून पेंशनचा मुद्दा तसाच रखडलेला आहे आणि या अल्पशा पेंशनने त्रस्त होऊन अनेक पेंशन धारकांना आपले प्राण सुध्दा गमवावे लागले.ईपीएस पेंशन धारकांची गंभीरता लक्षात घेऊन या निवृत्तीवेतनाच्या संदर्भात गेल्या १२ वर्षांपासून अनेक खासदारांनी प्रत्येक अधिवेशनात वेळोवेळी प्रश्न उपस्थित केले आणि करीत असतात व त्यावर अनेक चर्चा सुध्दा झाल्यात आणि होतात सुध्दा.परंतु या सर्व चर्चावर सरकारकडुन ठोस निर्णय होत नसल्याने संपूर्ण चर्चा फोल ठरून फक्त ''चर्चे त पे चर्चा'' रहाल्या आणि यांवर सरकारकडून कोणतेही ठोस पाऊल उचलल्याचे दिसले नाही. गेल्या १२ वर्षांपासून वृध्द पेंशनधारक अनेक आंदोलने करीत आहे व सरकारसोबत चर्चा करीत आहे परंतु यातून काहीच साध्य झाल्याचे दिसत नाही. परंतु या अधिवेशना अंतर्गत पेंशन धारकांच्या आशा उंचावल्या होत्या. केंद्राच्या कर्मचारी निवृत्तीवेतन योजना १९९५ (ईपीएस) अंतर्गत सध्या मिळणाऱ्या एक हजार रूपयांच्या किमान मासिक निवृत्तीवेतनाचा तातडीने आणि सर्वसमावेशक फेरआढावा घेण्याची शिफारस एका संसदीय समितीने मंगळवार दिनांक १७ मार्च २०२६ ला केली.वाढत्या महागाईच्या काळात निवृत्तांना दिलासा देण्यासाठी निवृत्तीवेतन अधिक वास्तववादी आणि सन्मानजनक पातळीवर नेण्याची गरज व्यक्त करतांना ते दरमहा किमान ७५०० रूपये करावे अशी महत्वपूर्ण शिफारस या समितीने केली आहे. किमान मासिक पेन्शन साडेसात हजार रुपये करावे या मागणीसाठी निवृत्तीवेतनधारकांनी ९ मार्चपासून जंतरमंतर येथे तीन दिवसांचे आंदोलन केल्याच्या पार्श्वभूमीवर कामगार, वस्त्रोद्योग आणि कौशल्यविकासविषयक संसदीय स्थायी समितीने केलेली ही शिफारस लक्षणीय मानली जाते.परंतु सरकारने ईपीएस -९५ पेन्शन बद्दल कोणतीही ठोस निर्णय घेतलेला नाही.असे वाटत होते की पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सरकार किमान पेंशनवर ताबडतोब ठोस निर्णय घेईल. परंतु अजूनही ठोस निर्णय घेतलेला नाही.परंतु ईपीएस -९५ पेन्शन धारकांसाठी स्थापन केलेली संसदीय समितीच्या माध्यमातून पाच विधानसभा निवडणुकीच्या आधी निर्णय लागेल अशी आशा लाखो पेन्शन धारकांना होती. आज महागाईमुळे देशातील कामगारवर्ग त्रस्त आहे याचे पडसाद आपल्याला आंदोलनाच्या माध्यमातून देशभरात पहायला मिळते तरीही सरकारला अजून पर्यंत जाग आलेला नाही. महागाईमुळे कामगारांचे किती हाल बेहाल होत आहे याचे जिवंत उदाहरण नोएडा,मानेसर (पंजाब), फरिदाबाद,(भिवडी) राजस्थान येथे नुकतेच आंदोलनादरम्यान दिसून आले. कामगारांचे आंदोलन एकुण ८३ ठिकाणी झाले आणि या आंदोलनात तब्बल ४२ हजार कामगार सहभागी झाले होते. यावरून आपण समजू शकतो की महागाईमुळे कामगारांचे किती हाल होत असतील आणि गंभीर समस्यांचा सामना करावा लागत असावा.सध्याच्या परिस्थितीत देशातील अनेक कंपन्यांमध्ये कामाचे १२ तास झाल्याचे दिसून येते. यानूसार त्यांना त्यांच्या कामाच्या मोबदल्याचे वेतन मिळत नाही.त्यामुळे त्यांना आंदोलनाचा मार्ग अवलंबावा लागला व सरकार कामगारांसमोर झुकले.पुढेचालुन हेही कामगार पेंशन धारक होणार आहेत याचाही विचार सरकारने करने गरजेचे आहे. त्याचप्रमाणे देशात अनेक कंपन्यांनमध्ये कामाचे १२ झाल्याचे कामगारांचा एनर्जी पॉवर सुध्दा कमी होतांना दिसत असून मोठ्या प्रमाणात मानसिक तणाव दिसून येतो.यामुळे कामगारांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होतांना आपण पहातो.यावरून कामगार क्षेत्रातील कामगार असो अथवा पेन्शनधारक त्याने कितीही संघर्ष केला तरी सरकार त्याला कामाचा मोबदला देण्यास नेहमीच टाळाटाळ करतांना दिसते. ईपीएस-९५ पेन्शन धारकांसाठी सरकारने संसदीय समिती स्थापन केली.परंतु आता शंका आहे या संसदीय समितीकडून ईपीएस पेन्शन धारकांना खरोखरच न्याय मिळेल का?यातही शंका निर्माण होत आहे.कारण सरकारला जर कोणत्याही गोष्टीची टाळाटाळ करायची असेल तर समिती स्थापन करून आपले कपडे झटकण्याचे काम सरकार नेहमीच करीत असते. त्यामुळे ईपीएस पेन्शन धारकांसाठी तयार करण्यात आलेली संसदीय समिती हा फक्त दिखावा असल्याचे सीध्द होत आहे. सरकारला जर पेंशन धारकांची एवढीच काळजी असती तर लोकसभा अधिवेशनात किमान पेन्शन ७५०० रूपये व त्यावर महागाई भत्ता देण्याची शिफारस ताबडतोब केली असती. त्यामुळे सरकारच्या करनी आणि कथनीमध्ये जमिन आसमानचा फरक दिसून येतो.आज ईपीएस पेन्शन धारक अल्पशा पेंशनमध्ये जगुही शकत नाही आणि मरूही शकत नाही अशी गंभीर परिस्थिती आज पेंशन धारकांची झाली आहे. ज्या गोष्टीची आवश्यकता नाही त्याला सरकार जास्त प्राधान्य देताना दिसते.त्या अनुषंगाने येणाऱ्या लोकसभेत ८५० खासदार रहाणार आहेत.ही सरकारची मनमानी नाही का? यांना मिळणारा पगार,पेन्शन, गाडी,बंगले,भत्ते हा देशावर बोजा पडणार नाही का?या सर्व गोष्टी सरकारला माहीत असतांना सुध्दा ईपीएस पेन्शन धारकांना फक्त ७५०० रूपये पेंशन देऊ शकत नाही ही अत्यंत लाजिरवाणी बाब आहे. सरकार खासदारांची संख्या वाढविण्याची दृष्टीने लोकसभेत बिल आणले आहे याचे स्वागत अशाच पध्दतीने सरकार ईपीएस-९५ पेंशनचे लोकसभेत बिल आणुन पास का करीत नाही? असे अनेक प्रश्न आज ईपीएस पेन्शन धारक सरकारला विचारत आहे.देशात ५४३ खासदार व राज्यसभेचे २४५ खासदार, प्रत्येक राज्याचे आमदार, जिल्हा परिषद सदस्य, नगरसेवक एवढा मोठा फौजफाटा देशसेवेसाठी असतांना खासदारांची संख्या वाढविण्याची सरकारला गरज का भासावी?असा प्रश्न आज देशाची १४० कोटी जनता विचारत आहे.ईपीएस-९५ पेंशन धारक अल्पशा पेंशनने मरत आहे ही बाब सरकारला दिसत नाही कारण डोळ्यांवर पट्टी बांधून आहे.महागाईने संपूर्ण उच्चांक गाठले, सोन्याचे भाव आभाळाला टेकले, आरोग्य सुविधा महागल्या, औषधोपचार महागले,पाण्याचे बिल वाढले, इलेक्ट्रिक बिल वाढले,घरटॅक्स वाढला तरी अल्पशा पेंशनमध्ये ईपीएस पेन्शन धारक आपला उदरनिर्वाह करीत आहे.आमदार -खासदार-मंत्री याचे पगार, पेन्शन, भत्ते वाढले.परंतु ईपीएस-९५ पेंशन धारकांचे किमान निवृत्तीपेंशन आजही फक्त हजार रुपयेच आहे.याचा सरकारने गांभीर्याने विचार करावा आणि ताबडतोब ईपीएस -९५ पेन्शन ७५०० रूपये पेंशन व महागाई भत्ता लागू करून पेन्शन धारकांना दिलासा द्यावा ही केंद्र सरकारला माझी कळकळीची विनंती आहे.जय हिंद.

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**मो.नं. ९९२१६९०७७९, नागपूर.**

# गणेश साहू आणि शीबा शेख यांनी अंधेरी येथे भव्य युथ आयकॉन इंडियन अवॉड्‌र्सचे आयोजन

**मुंबई.** - हाजी अली दर्गा आणि माहीम दर्ग्याचे विश्वस्त सुहेल खंडवाणी आणि दैनिक मुंबई हलचलचे संपादक दिलशाद एस. खान यांनी प्रमुख पाहुणे म्हणून या कार्यक्रमाला उपस्थित राहून शोभा वाढवली. नुकतेच, अंधेरी येथील मुक्ती कल्चर हॉलमध्ये भव्य आणि नेत्रदीपक मिस अँड किड्स एशिया सुपर मॉडेल २०२६ (सीझन २) आणि युथ आयकॉन इंडियन अवॉड्‌र्स (सीझन ३) पार पडले. गणेश साहू आणि शीबा शेख (शीबा मीडिया वर्क्स) यांनी या कार्यक्रमाचे यशस्वीपणे आयोजन केले होते आणि या कार्यक्रमाला बॉलीवूड, राजकारण, प्रशासन आणि समाज यांसारख्या विविध क्षेत्रांतील अनेक प्रमुख व्यक्तींनी हजेरी लावली होती. हाजी अली दर्गा आणि माहीम दर्ग्याचे विश्वस्त सुहेल खंडवाणी आणि दैनिक मुंबई हलचलचे संपादक दिलशाद एस. खान यांनी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहून कार्यक्रमाची भव्यता वाढवली. या भव्य कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रसिद्ध अभिनेत्री, मॉडेल आणि माजी मिस इंडिया सिमरन आहुजा यांनी केले. त्यांनी आपल्या प्रभावी मंचीय उपस्थितीने आणि उत्साही सादरीकरणाने वातावरण जिवंत केले. या कार्यक्रमादरम्यान समाजाच्या विविध क्षेत्रांमध्ये उत्कृष्ट कार्य केलेल्या अनेक मान्यवरांचा सन्मान करण्यात आला. यामध्ये साजिद पटेल, राज सिंग राठोड, राजू पेंडेकर, विजय शाह, मुंबई पोलीस डीसीपी राज खतीब, पोलीस निरीक्षक रमेश केशव निकम, फ ूल सिंग आणि नेहा शर्मा यांच्यासह इतरांचा समावेश होता. परेश मनियार आणि परिता मनियार (पवित्रम डायमंड ज्वेलरी) यांनीही आपल्या सक्रिय सहभागाने कार्यक्रमाची शोभा वाढवली. फॅशन शो दरम्यान, विविध मॉडेल्सनी आपल्या रॅम्प वॉकने प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. प्रसिद्ध डिझायनर राज शर्मा, अंबर शफीक (पाकिस्तानी ड्रेस डिझायनर) आणि राजेश शर्मा यांनी तयार केलेल्या मनमोहक पोशाखांनी कार्यक्रमाची शोभा वाढवली. नृत्यदिग्दर्शक आणि ग्रूमिंग मार्गदर्शकांच्या उत्कृष्ट सादरीकरणाने कार्यक्रमाची प्रभावीता आणखी वाढवली. दिबियापूर (उत्तर प्रदेश) येथील प्रसिद्ध जादूगार रिझोली बॉस हे कार्यक्रमाचे विशेष आकर्षण होते, ज्यांनी आपल्या अद्भुत जादूच्या युक्त्यांनी प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. बॉलिवूड सुपरस्टार सलमान खानच्या लकी चित्रपटातील अभिनेत्री स्नेहा उल्लालच्या उपस्थितीने हा कार्यक्रम अधिकच खास बनला. तिने तिच्या लोकप्रिय गाण्याच्या मनमोहक सादरीकरणाने सर्वांची मने जिंकली. अंधेरी येथील मुक्ती कल्चर हॉलमध्ये आयोजित हा कार्यक्रम अनेक प्रसिद्ध बॉलिवूड व्यक्तिमत्त्वांच्या उपस्थितीने अविस्मरणीय ठरला. या कार्यक्रमाने केवळ मनोरंजनच केले नाही, तर समाजाच्या विविध क्षेत्रांमध्ये उत्कृष्ट योगदान देणाऱ्या व्यक्तींचा सन्मान करण्याचा एक प्रशंसनीय प्रयत्नही सिद्ध केला.



# सखी वन स्टॉप सेंटर म्हणजे पीडित महिलांच्या हक्काचा आधारवड

**जालना । प्रतिनिधी -** समाजातील पीडित असलेल्या महिलांच्या पाठीशी उभे राहत लढा देवून त्यांना न्याय मिळवून देण्याचे कार्य सखी वन स्टॉप सेंटरच्या माध्यमातून केले जात आहे. त्यामुळे पीडित महिलांसाठी हे केंद्र हक्काचे आधारवड ठरत आहे. याठिकाणी एकाच छताखाली सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्यात आहेत. जालना जिल्ह्यात जिल्हा सामान्य रुग्णालय परिसरात (घाटी) सखी वन स्टॉप सेंटर जुन २०१९ पासून कार्यान्वित आहे. केंद्राचा संपर्क क्रमांक ९४२२२६१५१६ असा असून एकाच छताखाली वैद्यकीय, कायदेशीर मदत, समुपदेशन, गरज असल्यास आश्रयाची सोयही उपलब्ध करू दिली जाते. त्यामुळे समाजातील पीडित महिलांना न्याय मिळवून देण्यासाठी हे केंद्र महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहे.

महिला व बालविकास मंत्रालयाकडून ते चालवले जाते. शारीरिक, मानसिक, लैंगिक छळ, कौटुंबिक छळ, ॲसिड हल्ला किंवा सायबर क्राईममधील अत्याचारास बळी पडलेल्या महिलांना पोलिस, वकील, समुपदेशक अशा अनेकांची मदत घ्यावी लागते. अशावेळी सखी वन स्टॉप सेंटर पीडितेच्या पाठीशी उभे राहून लढा देत न्याय मिळवून देत आहे. कौटुंबिक हिंसाचार, लैंगिक शोषण, हुंडाबळी, छळ, जाच, ॲसिड हल्ले, आणि बाल लैंगिक शोषणग्रस्त पीडितांना या ठिकाणी मदत केली जाते.




सहा प्रकारची केली जाते मदत :-

पीडित महिलांना कायदेशीर मदत, पोलिस मदत, समुपदेशन, वैद्यकीय मदत, तात्पुरता निवारा, व्हिडीओ कॉन्फरन्स सुविधा, पोलिस सहाय्यता आदींची मदत देतात. हे कार्यालय २४ तास सुरु असते. त्यासाठी १३ कर्मचारी आहेत. गरजेनुसार त्यांना पाच दिवसाचा तात्पुरता निवारा दिला जातो. सद्यस्थितीत केंद्रामध्ये एकाच वेळी ५ महिला व्यवस्थित राहू शकतील एवढी क्षमता या निवारा गृहाची आहे.

महिलांना न्याय मिळवून देण्यासाठी विविध सेवा :-

या अडीच वर्षांच्या कालावधीत या सेंटरने जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयाच्या मदतीने जुन २०१९ ते मार्च २०२६ या कालावधीत आजपर्यंत ८७५ पीडित महिलांच्या विविध समस्यांवर निवारण करुन त्यांना विविध सेवा उपलब्ध करुन देत न्याय देण्याचे कार्य केले आहे. तसेच वकिल ही उपलब्ध करून देण्यात आले आहेत. श्रीमती वनिता पिंपळे, केंद्र व्यवस्थापक, जालना

तातडीच्या मदतीसाठी १८१ हेल्पलाइन :-

तातडीच्या मदतीसाठी शासनाचा १८१ हा महिला हेल्पलाईन क्रमांक कार्यान्वित आहे. जालना जिल्ह्यातील गरजू आणि संकटग्रस्त महिलांनी कोणत्याही भितीशिवाय या क्रमांकावर किंवा सखी केंद्राशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी राजेंद्र कड, आणि सखी वन स्टॉप सेंटरच्या केंद्र व्यवस्थापक वनिता पिंपळे यांनी केले आहे.

# जगाला युद्ध नको बुद्ध हवा

## टेंभुर्णी येथील आंबेडकर जयंती कार्यक्रमात नसीम शेख यांचे प्रतिपादन

**दत्ता देशमुख**

**टेंभुर्णी -** आज संपूर्ण जग हे अशांत असून जगात शांतता निर्माण करण्यासाठी बुद्ध व त्याच्या धम्माची सर्वांना गरज आहे. तथागत गौतम बुद्धांचे शांततावादी विचार व भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या साम्यवादी विचारातून या जगात पुनः शांती निर्माण होऊ शकते. यासाठी आज सर्वांच्या हृदयातून युद्ध नको बुद्ध हवा हा आशावाद प्रकट होत आहे. असे विचार मानव सेवा मंडळाचे प्रांत सचिव नसीम शेख यांनी व्यक्त केले. मंगळवारी येथील नालंदा बुद्ध विहारात आयोजित भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती सोहळ्यात ते बोलत होते. यावेळी पुढे बोलताना ते म्हणाले की आज काही शक्तींकडून या देशात धर्मा- धर्मात व जाती-जातीत तेढ निर्माण करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केला जात आहे. जो भारतासारख्या धर्मनिरपेक्ष देशासाठी निश्चितच घातक आहे. भविष्यातील हा धोका ओळखून सर्वांनी समता, स्वातंत्र्य न्याय, बंधुता या संविधानातील तत्त्वांना आणखी बळकटी आणण्यासाठी संघटित व्हावे असे आवाहनही त्यांनी उपस्थितांना केले.

येथे उत्सव समितीतर्फे क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंती निमित्त ११ एप्रिल ते १४ एप्रिल पर्यंत विविध सामाजिक, सांस्कृतिक व वैचारिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. आज आयोजित परिसंवाद कार्यक्रमात महामानवांचे मानवतावादी व समतावादी विचार काळाची गरज या विषयावर वैचारिक मंथन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी सरपंच सुमन म्हस्के, तंटामुक्त समिती अध्यक्ष पी.जी. तांबेकर, आदर्श शिक्षक शेख जमीर, माजी उपसरपंच फैसल चाऊस, माजी सुभेदार प्रभू वाघमारे, पोलीस जमादार सागर शिवरकर, राहुल मघाडे, किशोर कांबळे, सिताराम गोफणे, शशिकला मघाडे, एस.व्ही.पैठणे, नसीम शेख, गौतम म्हस्के, भावसिंग खांडेभराड, दीपक शिंदे, गुड्डू मघाडे ससाने, वानखेडे आदींची मंचावर विशेष उपस्थिती होती.



यावेळी पी.जी. तांबेकर, जमीर शेख, किशोर कांबळे, पैसल चाऊस, गौतम म्हस्के आदी मान्यवरांनी महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या साम्यवादी विचारांची आज संपूर्ण विश्वाला गरज असल्याचे म्हटले. यावेळी जयंती सोहळ्या दरम्यान घेण्यात आलेल्या विविध स्पर्धेतील विजेत्यांनाही मान्यवरांच्या हस्ते बक्षिसाचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गौतम चंदनशिवे यांनी केले तर प्रास्ताविक प्राचार्य जगन मघाडे यांनी केले. कार्यक्रमासाठी उत्सव समितीचे अध्यक्ष आशिष पैठणे, उपाध्यक्ष गणेश म्हस्के, सचिव किरण कासारे यांच्यासह डॉ. आंबेडकर जयंती उत्सव समिती व रमाई जयंती उत्सव समितीच्या पदाधिकाऱ्यांनी पुढाकार घेतला. कार्यक्रमाला महिला, पुरुष व शाळकरी मुलांची मोठी उपस्थिती होती.

चौकट- सायंकाळी निघाली भव्य मिरवणूक दरम्यान मंगळवारी सायंकाळी सहा वाजता येथील नालंदा बुद्ध विहारापासून बाबासाहेबांच्या प्रतिमेची भव्य मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत तरुणाईने दिलेल्या गगनभेदी घोषणांनी परिसर दणाणून गेला. मिरवणुकी दरम्यान ग्रामस्थांनी ठिकठिकाणी बाबासाहेबांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. या मिरवणुकीची सांगता रात्री डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाजवळ करण्यात आली.

# तक्षशिला बौद्ध विहारामध्ये महात्मा फुले जयंती शिक्षक दिन म्हणून साजरा!

**दत्ता देशमुख**

**टेंभुर्णी =** जालना येथील तक्षशीला बहुउद्देशीय संस्था आयोजित महात्मा ज्योतिबा फुले यांच्या द्विशतकोत्तर जयंतीनिमित्त प्रा.डॉ.बसवराज कोरे यांनी मार्गदर्शन केले.यावेळी व्यासपीठावरील सर्व मान्यवरांनी क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन केले. समाजाचे परिवर्तन होण्यासाठी पुस्तकांचे वाचन होणे गरजेचे आहे. सर्व समावेशक धर्मांचा अभ्यास महत्वाचा आहे,तो सर्वांनी केला पाहिजे असा सल्ला डॉ. बसवराज कोरे यांनी दिला. प्रा.किशोर साळवे यांना पीएचडी प्राप्त झाल्याबद्दल विशेष सत्कार प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आला.यावेळी मनोविकार तज्ञ डॉ. लुम्बिनी (जिल्हा सामान्य रुग्णालय), विशाखा माने(समाजसेवा अधीक्षक वैद्यकीय सिविल हॉस्पिटल जालना) तक्षशिला बौद्ध विहाराचे अध्यक्ष भिकाजी साळवे, चंद्रकांत वाघमारे, अशोक गंगावणे, राजेश




बगळे, प्रल्हाद वाघ, वळसे सर, डॉ.निहाळ सर, चव्हाण सर, डॉ.बुक्तरे सर, सचिन भारोटे, फूके सर, राठोड सर,सुप्रिया बगळे, प्रा.संभाजी कांबळे, राहुल खरात, मारुती गायकवाड,ज्योती मगरे, मिनाबाई शरणागत, महेश शिंदे, तसेच तीस आदर्श शिक्षकांचे सत्कार यावेळी करण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन श्री महेंद्र साळवे यांनी केले सूत्रसंचालन संदीप इंगोले तर आभार प्रदर्शन प्रा.संभाजी कांबळे यांनी केले.

# जामिनावर सुटलेल्या आरोपीस पुन्हा ताब्यात घेणे म्हणजे स्वातंत्र्यावर गदा

## सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाचे ॲड. महेश धन्नावत यांच्याकडून स्वागत

**जालना । प्रतिनिधी -** एखाद्या गुन्ह्यात आरोपीला न्यायालयाने जामीन मंजूर केल्यानंतर, त्याची कारागृहातून सुटका होताच त्याला प्रतिबंधात्मक कायद्यांखाली पुन्हा ताब्यात घेण्याची पोलिसांची प्रथा म्हणजे व्यक्ती स्वातंत्र्यावर गदा आणण्यासारखे आहे. सर्वोच्च न्यायालयाने नुकत्याच एका निकालात या प्रथेवर तीव्र ताशेरे ओढले असून, हा निकाल काळाची गरज असल्याची प्रतिक्रिया नोटरी असोसिएशनचे कार्याध्यक्ष ॲड. महेश एस. धन्नावत यांनी व्यक्त केली आहे.सर्वोच्च न्यायालयाने रोहिणी देवी विरुद्ध तेलंगणा राज्य या खटल्यात दिलेल्या निकालाचे स्वागत करताना ॲड. धन्नावत यांनी सांगितले की, जालन्यासह अनेक ठिकाणी ही गंभीर समस्या आहे. ते म्हणाले, ''जेव्हा एखाद्या आरोपीला कठीण कायदेशीर प्रक्रियेनंतर जामीन मिळतो आणि तो कारागृहातून बाहेर येतो, तेव्हा त्याचे कुटुंबीय त्याला घेण्यासाठी आलेले असतात. तो सुटकेचा आनंद अनुभवत असतो, त्याच क्षणी पोलीस त्याला प्रतिबंधात्मक कारवाईच्या नावाखाली पुन्हा ताब्यात घेतात. हा प्रकार केवळ बेकायदेशीरच नाही, तर अत्यंत अमानवी आणि मानसिक छळवणूक करणारा आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या या निकालामुळे पोलिसांच्या या मनमानी कारभाराला आता चाप बसेल.''''सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे की, केवळ आरोपी जामिनावर सुटल्यानंतर पुन्हा गुन्हा करेल या भीतीपोटी प्रतिबंधात्मक स्थानबद्धतेचा वापर करता येणार नाही. जर आरोपीने जामिनाच्या अटींचा भंग केला असेल, तर पोलिसांकडे जामीन रद्द करण्यासाठी न्यायालयात अर्ज करण्याचा कायदेशीर पर्याय उपलब्ध आहे. मात्र, सामान्य फौजदारी कायद्याला बगल देऊन थेट प्रतिबंधात्मक कायद्याचा वापर करणे म्हणजे न्यायालयाच्या आदेशाचा अपमान करण्यासारखे आहे. या निकालामुळे आता पोलीस कारागृहाच्या बाहेर थांबून जामिनावर सुटलेल्या व्यक्तीला त्रास देऊ शकणार नाहीत.''

संदर्भित प्रकरणात, याचिकाकर्त्याला जामीन मिळाल्यास ती पुन्हा गुन्हेगारी कृत्यांमध्ये सहभागी होईल, या शक्यतेवर स्थानबद्धतेचा आदेश देण्यात आला होता. सर्वोच्च न्यायालयाने हा आदेश रद्द करताना म्हटले की, प्रतिबंधात्मक स्थानबद्धतेचा कायदा हा एक कठोर कायदा आहे आणि त्याचा वापर केवळ अपवादात्मक परिस्थितीतच केला पाहिजे. सामान्य फौजदारी कायद्यातील तरतुदी (उदा. दंड प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम ४१-अ, ज्याची तरतूद आता भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ च्या कलम ३५ मध्ये आहे) पुरेशा असताना, प्रतिबंधात्मक कायद्याचा आधार घेणे हे अधिकारक्षेत्राचे उल्लंघन आहे.

ॲड. धन्नावत यांनी महाराष्ट्र राज्याच्या गृह विभागाकडे मागणी केली आहे की, ''सर्वोच्च न्यायालयाच्या या महत्त्वपूर्ण निकालाच्या आधारे, राज्याच्या पोलीस महासंचालकांनी तात्काळ एक परिपत्रक काढून राज्यातील सर्व पोलीस ठाण्यांना स्पष्ट निर्देश द्यावेत. या परिपत्रकात, जामिनावर सुटलेल्या कोणत्याही व्यक्तीला कारागृहाच्या दारातूनच प्रतिबंधात्मक कारवाईच्या नावाखाली पुन्हा ताब्यात घेऊ नये, अशा कडक सूचना देण्यात याव्यात.''

# सेवा हक्क दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन

**जालना । प्रतिनिधी -** महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमाची प्रभावी अंमलबजावणी आणि नागरिकांमध्ये या कायद्याबाबत व्यापक जनजागृती करण्यासाठी आगामी २८ एप्रिल हा दिवस 'सेवा हक्क दिन' म्हणून साजरा केला जाणार आहे. या निमित्ताने जालना जिल्हाधिकारी कार्यालयाच्या वतीने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री पंकजा मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली विशेष समारंभ पार पडणार आहे. सामान्य प्रशासन विभागाने १ एप्रिल २०२५ रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार २८ एप्रिल हा दिवस 'सेवा हक्क दिन' म्हणून साजरा करण्यास मान्यता दिली आहे. त्याअनुषंगाने २८ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ११ वाजता जिल्हा नियोजन समिती सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय येथे मुख्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमास जिल्ह्यातील सर्व खासदार, आमदार, लोकप्रतिनिधी, स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी, पत्रकार आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे. राज्य सेवा हक्क आयोगाच्या कामाची माहिती पोहोचवणे आणि 'आपले सरकार' पोर्टलच्या माध्यमातून ऑनलाइन उपलब्ध असलेल्या सेवांची माहिती सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचवणे हा या दिनाचा मुख्य उद्देश आहे. पारदर्शक आणि गतिमान प्रशासनासाठी हा कायदा अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. या दिनाचे औचित्य साधून जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत जिल्हापातळीवर एका खुल्या निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. 'महाराष्ट्र लोकसेवा हक्क कायदा एक वरदान' या विषयावर दि. २२ एप्रिल २०२६ पर्यंत निबंध सादर करणे आवश्यक आहे.

# भारतीय संविधानाच्या मूल्यानुसार जनसामान्यांना शासन-प्रशासन व्यवस्थेने न्याय द्यावा - प्राचार्य डॉ. राजकुमार म्हस्के



**जालना । प्रतिनिधी -** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त १४ एप्रिल रोजी जिल्हा परिषदच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात ''डॉ. बाबासाहेब आंबेडकर व भारतीय संविधान'' या विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात प्राचार्य डॉ. राजकुमार म्हस्के यांनी मार्गदर्शन करताना भारतीय संविधानाच्या मूल्यानुसार जनसामान्यांना शासन व प्रशासन व्यवस्थेमार्फत न्याय मिळाला पाहिजे, असे प्रतिपादन केले.

यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कृष्णकांत कनवारिया, महानगरपालिका आयुक्त अंजली शर्मा, उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र तुबाकले, शिक्षणाधिकारी श्रीमती सानप, उपशिक्षण अधिकारी कायदे, लेखाधिकारी मिलिंद कांबळे, कक्ष अधिकारी मधुकर राठोड, राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमाच्या पर्यवेक्षक विद्या म्हस्के तसेच आरोग्य विभागाच्या मनीषा कांबळे यांची उपस्थिती होती.

प्राचार्य डॉ. म्हस्के यांनी आपल्या व्याख्यानात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय संविधानाच्या माध्यमातून देशातील प्रत्येक नागरिकाला समानता, स्वातंत्र्य, बंधुता व न्यायाचे अधिकार दिले असल्याचे सांगितले. संविधान हे केवळ पुस्तक नसून देशाच्या प्रगतीचा मार्गदर्शक दस्तऐवज असल्याचे त्यांनी नमूद केले.

मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कृष्णकांत कनवारिया यांनी संविधानानुसार काम करण्याचे महत्त्व अधोरेखित केले. मनपा आयुक्त अंजली शर्मा यांनी उपस्थितांना शुभेच्छा देत सर्वांनी बाबासाहेबांच्या विचारांवर चालण्याची गरज व्यक्त केली. कार्यक्रमास जिल्हा परिषद अधिकारी, कर्मचारी व विविध विभागांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# हर्षवर्धन राहुल लोणीकर यांनी इयत्ता दहावीच्या वर्गात ९५ टक्के गुणांसह प्रथम श्रेणीत उत्तीर्ण

**परतूर । प्रतिनिधी** - शुद्ध बीजापोटी फळे रसाळ गोमटी या उक्तीचा प्रत्यय हर्षवर्धन राहुल लोणीकर यांनी नाथ व्हॅली स्कूल छत्रपती संभाजीनगर येथून सीबीएससी पॅटर्नच्या इयत्ता दहावीच्या वर्गामध्ये ९५ टक्के गुण मिळवून सिद्ध केले आहे याविषयी सविस्तर वृत्त असे की आज सीबीएससी माध्यमाच्या इयत्ता दहावीचा निकाल घोषित करण्यात आला असून त्यामध्ये नाथ व्हॅली स्कूलचा विद्यार्थी असलेला हर्षवर्धन राहुल लोणीकर हा माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांचा नातू व मा.प्रदेशाध्यक्ष भारतीय जनता युवा मोर्चा तथा कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती राहुल लोणीकर यांचे चिरंजीव असून त्यांनी इयत्ता दहावीच्या वर्गामध्ये घवघवीत यश संपादन केले आहे.

हर्षवर्धन ने उत्तम बुद्धीचा धनी म्हणून वडिलासारखीच उत्तम कामगिरी करण्याचा मान मिळवला आहे.

''वडील आणि आजोबा राजकारणात सक्रिय असतानाही, त्यांच्या प्रेरणेने आणि आईच्या मार्गदर्शनाखाली हर्षवर्धन राहुल लोणीकर याने दहावीमध्ये ९५% गुण मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले.''

या संदर्भामध्ये हर्षवर्धन राहुल लोणीकर यांना विचारले असता त्यांनी असे सांगितले की माझे आजोबा आणि वडील राजकारणात आणि समाजकारणात सक्रिय असूनही त्यांनी वेळोवेळी मार्गदर्शन केले व एक प्रेरणा दिली व तसेच माझी आई सौ दिव्याताई राहुल लोणीकर ज्या मुळातच डीएड, बीएड असून एक शिक्षक म्हणून उत्तम भूमिका त्यांनी निभावत मला वेळोवेळी मार्गदर्शन केले त्यामुळेच या यशाचा टप्पा मी गाठू शकलो असे मत यावेळी हर्षवर्धन राहुल लोणीकर यांनी व्यक्त



केले आहे. त्याचे जालना जिल्ह्यासह मराठवाड्यातून सर्व स्तरातून कौतुक केले जात आहे. त्याच्या या यशाबद्दल आजोबा माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर वडील राहुल बबनराव लोणीकर आजी सौ मंदाताई बबनराव लोणीकर , सौ वंदनाताई बबनराव लोणीकर, आई सौ दिव्या ताई राहुल लोणीकर , सौ मीना किशोर आबा पवार , सौ रोहिणी सुकृत पाटील , भक्ती बबनराव लोणीकर, श्रीजय बबनराव लोणीकर पंकजा राहुल लोणीकर यांच्या सह सुनील बापू लोणीकर गजानन लोणीकर प्रशांत लोणीकर व परिवारातील सर्व सदस्यांनी हर्षवर्धन याचे अभिनंदन केले.

## जालन्याचा रिल्स स्टार अरुण जाधव व सुनीता जाधव यांना महाराष्ट्र नायक राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर

**जालना । प्रतिनिधी** - कला क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल रिल्स स्टार अरुण भिकराम जाधव व सुनीता अरुण जाधव यांना ''महाराष्ट्र नायक'' राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

समाज प्रतिबिंब बहुउद्देशीय संस्था, अमरावती, बी.एस.एफ बहुउद्देशीय संस्था, संत कबीर बहुउद्देशीय संस्था बुलढाणा आणि उपेक्षित नायक न्यूज यांच्या संयुक्त विद्यमाने या पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमधील सामाजिक, कृषी, क्रीडा, उद्योग, शैक्षणिक, प्रशासकीय व कला क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या सुमारे ५०



जणांचा या सोहळ्यात सन्मान करण्यात येणार आहे.

हा भव्य पुरस्कार सोहळा नाशिक येथे या महिन्यात पार पडणार असून चित्रपट सृष्टीतील दिग्गज कलाकारांच्या उपस्थितीत कार्यक्रम होणार आहे, अशी माहिती मुख्य आयोजक भूषण सरदार यांनी दिली.

## जालना पोलीस दलातील ज्ञानदेव जुंबड यांची पोलीस उपनिरीक्षकपदी पदोन्नती

**दत्ता देशमुख**

**टेंभुर्णी** - महाराष्ट्र पोलीस दलातील पदोन्नती प्रक्रियेतंर्गत जालना येथील पोलीस नियंत्रण कक्षात कार्यरत असलेले श्री.ज्ञानदेव भिमराव जुंबड यांची पोलीस उपनिरीक्षक () पदी पदोन्नती झाली आहे. महाराष्ट्र राज्य पोलीस महासंचालकांच्या आदेशानुसार ही पदोन्नती प्रक्रिया राबविण्यात आली. पदोन्नतीनंतर श्री.ज्ञानदेव जुंबड यांची नियुक्ती पोलीस प्रशिक्षण केंद्र, जालना येथे करण्यात आली आहे. पोलीस अधीक्षक कार्यालयामार्फत या पदोन्नतीबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे. पदोन्नती मिळाल्याबद्दल सर्व स्तरांतून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.



## जी श्रीकांत यांची १५ दिवसात पुन्हा बदली

**मुंबई** - राज्यातील आयएसएस अधिकाऱ्यांच्या बदल्यांचा धडका सुरुच असून कालच ५ सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या होत्या. त्यानंतर, आज पुन्हा एकदा चार आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. विशेष म्हणजे, या चार अधिकाऱ्यांमध्ये जी. श्रीकांत () यांचाही समावेश आहे. जी श्रीकांत हे सध्या नवी मुंबई जल जीवन मिशन अभियानाचे संचालक म्हणून कार्यरत आहेत. मात्र, आता त्यांना छत्रपती संभाजीनगरच्या विभागीय आयुक्तपदी नियुक्ती देण्यात आली आहे. विशेष म्हणजे, ३ एप्रिल रोजीच त्यांची जल जीवन मिशन नवी मुंबई येथे मिशन संचालक पदावर बदली करण्यात आली होती.

# प्राचार्य डॉ. विठ्ठल मोरे जीवनगौरव पुरस्काराने पी. एस. घाडगे सन्मानित!

**दत्ता देशमुख**

**टेंभुर्णी** - मराठवाडा शिक्षक संघाचे माजी अध्यक्ष तथा राज्यातील शिक्षक चळवळीचे नेते पी.एस. घाडगे यांना प्राचार्य डॉ. विठ्ठल मोरे जीवनगौरव-२०२६ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

याबाबत अधिक माहिती अशी की, प्राचार्य डॉक्टर विठ्ठल मोरे समाज विज्ञान फौंडेशन तर्फे शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यास प्राचार्य डॉ. विठ्ठल मोरे जीवनगौरव पुरस्कार दिला जातो. यावर्षीचा पुरस्कार मराठवाडा शिक्षक संघाचे माजी अध्यक्ष पी. एस. घाडगे यांना देण्यात आला. मंगळवार दिनांक १४ एप्रिल रोजी प्राचार्य डॉक्टर विठ्ठल मोरे याच्या स्मृतिदिनी शहीद भगतसिंग महाविद्यालय, किल्लारी येथे प्राचार्य कुसुमताई मोरे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या शानदार कार्यक्रमात, महाराष्ट्रातील ख्यातनाम साहित्यिक कवी व लेखक इंद्रजित भालेराव यांच्या हस्ते पी. एस. घाडगे यांना प्राचार्य विठ्ठल मोरे जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी प्रदान करण्यात आलेल्या सन्मानपत्रात म्हटले आहे की ''आपण शैक्षणिक व सामाजिक चळवळीमधे



सातत्याने सक्रिय राहून समाज घडविण्याचे महान कार्य केले आहे. शिक्षक चळवळीचे नेतृत्व करत असताना आपल्या ठाम विचारांनी, जिद्दीने आणि कार्यकर्त्यांच्या तळमळीने आपण अनेक शिक्षकांच्या जीवनात अमुलाग्र परिवर्तन घडवून आणले.

आपले संपूर्ण जीवन सामाजिक परिवर्तन आणि शैक्षणिक सुधारणा यासाठी समर्पित राहिले आहे. आपल्या कार्यातून समाज जागृती, प्रबोधन आणि सकारात्मक बदल घडत राहिले... हीच आपल्या जीवनकार्याची खरी ओळख आहे. आपल्या या प्रेरणादायी, नि:स्वार्थ आणि दैदिप्यमान कार्याची दखल घेऊन आपणांस प्राचार्य डॉक्टर विठ्ठल मोरे जीवनगौरव पुरस्कार-२०२६ प्रदान करून आम्ही सन्मानित करीत आहोत, याचा आम्हाला अत्यंत अभिमान वाटतो.

आपले मार्गदर्शन असेच समाजाला लाभत राहो, आणि आपल्या कार्याची प्रेरणा नव्या पिढीस मिळत राहो ही सदिच्छा!'' प्राचार्य डॉक्टर विठ्ठल मोरे जीवनगौरव पुरस्कार मिळाल्याबद्दल मराठवाडा शिक्षक संघाचे माजी सरचिटणीस व्ही.जी.पवार, अध्यक्ष सुर्यकांत विश्वासराव, सरचिटणीस राजकुमार कदम,उपाध्यक्ष ज्ञानोबा वरवट्टे, गुट्टे एस.जी.*कोषाध्यक्ष* औताडे ए.बी.,सहसचिव पवार टी.जी.,माळी एन.जी.,श्रीमती रेखा साळुंखे, केंद्रीय कार्यकारणी सदस्य बंडू अघाव, अशोक मस्कले, मधुकर जोंधळे, रातोळे जी.जी.,कुरेशी ए.ए.,राठोड पी.आर.,सुर्यवंशी आर.एन.,कदम व्ही.जी.,कौशल्य जी.पी.,पाटोदेकर ए.डी.,सोळंके एन.टी.,वऱ्हाड बी.ए.,तिर्थकर एस.एस.,जमादार एफ.बी.,पाटील पी.एस.यांच्यासह जिल्हाध्यक्ष कालीदास धपाटे, व्यंकटराव चिलवरवार, बसवेश्वर माने,शेरखाने जे.एस.,रमेश आंधळे, यशवंत मकरंद, हरिभाऊ भडके, हाळदे के.एम. जिल्हासचिव गणेश आजबे, रविंद्र वाकोडे, भाई चंद्रकांत चव्हाण, माने जी.व्ही.,विक्रम मायाचारी,संजय यळवंते, कदम एन.टी.,ढेंगळे व्ही.एस.,दिनेश पाटील, बीड जिल्ह्याचे माजी जिल्हाध्यक्ष तथा मार्गदर्शक डी.जी.तांदळे, लोकमान्य नागरी सहकारी पतस्थेंचे मुख्या कार्यकारी अधिकारी नितीन वायचळे, शाखाधिकारी चंद्रशेखर सरकटे व लोकमान्य परिवारातील पदिधिकारी व कर्मचाऱ्यांनी पी.एस. घाडगे यांचे अभिनंदन केले आहे.

### सिद्धार्थ महाविद्यालयात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती साजरी

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती व्याख्यानमालेचे चौदावे पुष्प अर्पण

**दत्ता देशमुख**

**टेंभुर्णी** - जाफराबाद येथील सिद्धार्थ कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.राहुल भाऊ म्हस्के होते तर प्रमुख वक्ते म्हणून जाफराबाद पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक माननीय सतीश जाधव यांची उपस्थिती होती.यावेळी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रो.डॉ.सुनील मेढे उपप्राचार्य, डॉ.श्याम सर्जे,उपप्राचार्य प्रा.विनोद हिवराळे,मूल्यशिक्षण समिती प्रमुख प्रो.डॉ.संतोष पहारे, प्रो. डॉ.विजय पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रमुख वक्ते माननीय सतीश जाधव यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचे महत्त्व अधोरेखित करताना सांगितले की,शिक्षण,समानता आणि सामाजिक न्याय या मूल्यांचा अंगीकार करूनच समाजाची खरी प्रगती साधता येईल तसेच भारतीय राज्यघटनेच्या रूपाने देशात कायद्याचे राज्य असून प्रत्येकाने अधिकार व हक्काबरोबर जबाबदारीचीही




जाणीव ठेवली पाहिजे असे सांगितले.तर अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ.राहुल भाऊ म्हस्के यांनी आपल्या सिद्धार्थ महाविद्यालयात दिनांक २ एप्रिल ते १४ एप्रिल २०२६ पर्यंत अखंडपणे व्याख्यानांची डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती व्याख्यानमालेत १४ प्रमुख वक्त्यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या शैक्षणिक, सामाजिक, राजकीय, आर्थिक इत्यादी कार्यांवर सखोल प्रकाश टाकून खऱ्या अर्थाने डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त अभिवादन केले असल्याचे सांगितले तसेच येत्या काळात छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त ही अशीच व्याख्यानमाला सुरू करण्याचा संकल्प त्यांनी बोलून दाखविला. यावेळी सिद्धार्थ महाविद्यालयाच्या वार्षिक अंकाचे विमोचन प्रमुख मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. अंकाचे संपादक प्रो. डॉ.विजय पाटील यांनी अंक छपाई करताना कोणकोणत्या गोष्टीचा कटाक्षाने विचार केला यांचे विवेचन केले. प्रास्ताविक करताना डॉ.संतोष पहारे यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती व्याख्यानमालेचे आयोजन, नियोजन,विषयाचे निवड आणि वक्त्यांची निवड याविषयी प्रस्ताविकेत आपले मत मांडले तसेच व्याख्यानमालेचा उद्देशही त्यांनी आपल्या प्रस्ताविकेत सांगितला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.संजय पाटील यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा.अमरसिंग धवलिया यांनी मानले या कार्यक्रमास महाविद्यालयातील प्रसिद्ध प्रमुख प्रा.अनिल वैद्य महाविद्यालयातील प्राध्यापक,शिक्षक,शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते व राष्ट्रगीताने कार्यक्रमाचे सांगता झाली.

## पादुका दर्शन हे साक्षात देवाच्या दर्शना सारखे - महेशगिरी महाराज

**दत्ता देशमुख** - टेंभुर्णी येथील रंगनाथ महाराज यांच्या पावन स्पर्श ने विस्थापित झालेल्या गणपती मंदिर येथे गजानन महाराज यांच्या पादुका दर्शन सोहळ्या निमित्य गौरी आश्रम मठाधिपती श्री महेश गिरी महाराज यांच्या मधुर वाणीतून कीर्तन रुपी सोहळा पार पडला. ओम नमो गुरुदेवां या मधुर मंत्राने सुरू झालेल्या सेवांना सुरू झालेल्या पादुका दर्शन ही पुण्याच्या कामातून एक महत्त्वाचे पुण्य असल्याचे त्यांनी सांगितले.पादुका दर्शन हे तुमच्या भाग्याचा एक काम असून पादुका दर्शन म्हणजे साक्षात देवाचे दर्शन होते असे महेश गिरी महाराज यांनी नमूद केले.

संतांनी आपल्या पायाने अनेक ठिकाणी जाऊन पाई यात्रा केल्या आपल्या शरीरातून कष्ट करून देवाची पूजा नामस्मरण केले. म्हणून त्यांच्या पादुका दर्शन ला मोठे महत्व आहे.पादुका दर्शन ला किती महत्व आहे हे त्यांनी महाभारत आणि रामायण चे काही प्रसंग सांगितले.भगवंताचे पादुका चरण स्पर्श म्हणजे पुण्य कर्म होय हे सगळ्याच्या भाग्यात नसते असे त्यांनी सांगून हा आजचा चांगला योग आल्याचे त्यांनी सांगितले. पादुका दर्शन होणे म्हणजे एक प्रकारे सेवा असून ही सेवा टेंभुर्णी करांच्या भाग्याचे काम होय. टेंभुर्णी येथील भातोडी येथील गजानन महाराज यांच्या मंदिर बांधकाम चे भव्य काम सुरु झाले असून येथे मोठा भक्त परिवार आहे. या



भक्त परिवार कडून आयोजित या कार्यक्रमाला मोठा भक्त परिवार उपस्थित होता.येथील भक्त राजू करवंदे यांनी त्यांच्या आई वडील यांच्या आठवणीतील ठेवा उजागर करण्यासाठी ही पादुका दर्शन कार्यक्रम संपन्न केला होता.

गण गणात बोते या गजाजन महाराज यांच्या मंत्राचा मोठ्या गजरं ने सगळा परिसर भक्तीमय झाला होता.

पादुका मध्ये एक वेगळी ऊर्जा असते ती स्पर्श केले त्यामुळे तुमचा स्पर्श भगतवांचे स्पर्श झाल्या सारखे असल्याचे सांगितले.कार्यक्रमाचे आभार ह.भ.प.रघुराम उखर्डे यांनी केले. शेवटी महाप्रसाद ने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# मंदिरांमधील 'पेड दर्शन' सुविधा बंद करा आणि देवस्थानांमध्ये राजकीय नियुक्त्या नकोत ! - सुनील घनवट

**त्र्यंबकेश्वर (नाशिक)** - येथील ज्योतिर्लिंग मंदिर संस्थानमध्ये भाविकांची आर्थिक लूट केल्याप्रकरणी शरद पवार गटाचे प्रदेश युवक कार्याध्यक्ष आणि मंदिर संस्थानचे विश्वस्त पुरुषोत्तम कडलग यांसह गोटीराम मनाजी पेहरे अन् अभिषेक कडलग यांना पोलिसांनी अटक केली आहे. येथे २०० रुपयाचा अधिकृत पास असतांना १० मिनिटांत दर्शनाचे आमीष दाखवून भाविकांकडून ३ ते १२ हजार रुपये मागितले जातात, असा प्रकार समोर आला आहे. हाच प्रकार तुळजापूर येथील तुळजाभवानी मंदिरात होत असून तेथे २०० रुपये 'पास' देऊन विशेष दर्शन दिले जाते. हाच 'पास' नवरात्र काळात ३०० रु, ५०० रुपये आणि १ हजार रुपये करण्यात येतो. येथेही अनेक वेळा अतिरिक्त शुल्क घेऊन दर्शनासाठी सोडल्याच्या भक्तांच्या तक्रारी आल्या आहेत. खरेतर 'सशुल्क दर्शनसेवा' हा प्रकारच चुकीचा असून यामुळे भाविकांमध्ये भेदभावाची भावना निर्माण होते. दूरवरून येणाऱ्या ज्या भक्तांकडे पैसे नाहीत त्यांनी काय करायचे? पैशांअभावी दर्शन नाकारले जाणे हा त्यांच्या श्रद्धेचा अपमान आहे आणि संविधानाने दिलेल्या मूलभूत घटनात्मक धार्मिक अधिकारावर आणलेली गदा आहे. देवाच्या दृष्टीने गरीब-श्रीमंत सर्व समान असल्याने प्रत्येकासाठी दर्शनाची पद्धत सारखीच असणे अपेक्षित आहे. केवळ उत्पन्न वाढीचा विचार करण्यासाठी मंदिर हे एखादे व्यावसायिक आस्थापन वा दुकान आहे का? त्याचसमवेत अशा पासचा काळाबाजार करण्याची वृत्ती सर्वत्र फोफावत आहे. त्यामुळे नाशिक, तुळजापूरसह राज्यातील सर्वच सरकारीकरण झालेल्या मंदिरांमधील 'सशुल्क दर्शनसेवा'(पेड दर्शन) सुविधा बंद करावी, अशी मागणी मंदिर महासंघाचे राष्ट्रीय संघटक श्री. सुनील घनवट यांनी केली आहे.

देवस्थानांमधील राजकीय नियुक्त्या बंद करा !

जेव्हा मंदिरे सरकार किंवा राजकीय नियुक्त्या असलेल्या समित्यांच्या कह्यात जातात, तेव्हा तिथे भक्तीऐवजी व्यापारी वृत्तीचा शिरकाव होतो. त्र्यंबकेश्वरमधील ही घटना म्हणजे मंदिर सरकारीकरणाचे दुष्परिणामच होय. 'अतिथी देवो भव ।' मानणाऱ्या भूमीत भाविकांना लुबाडण्यासाठी विश्वस्तांनीच यंत्रणा चालवावी, यासारखे दुसरे दुर्दैव नाही ! त्र्यंबकेश्वर देवस्थानातील विश्वस्त नियुक्तीत मोठा आर्थिक गैरव्यवहार झाल्याचा आरोप माजी विश्वस्तांनी केला आहे. त्यामुळे या 'पेड' दर्शनाची सखोल चौकशी करून यात आणखी कुणाचा सहभाग आहे, याचेही अन्वेषण व्हावे, अशी मागणी मंदिर महासंघाच्या वतीने करण्यात येत आहे. यापुढील काळात असे प्रकार टाळण्यासाठी देवस्थानांमध्ये विश्वस्त म्हणून कोणत्याही राजकीय पक्षाचा पदाधिकारी यांची नियुक्ती करण्याऐवजी तिथे देवाचा भक्त-भाविक म्हणून नेमणूक होणे आवश्यक आहे आणि यापुढे तसा बदल देवस्थानच्या घटनेत करावा, अशी मागणी मंदिर महासंघाच्या वतीने करत आहोत.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.